# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०१/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा कुजबा येथे दिनांक २०/०१/२०२२ चे १०.३० वा. दरम्यान **सौ. गिता रामदास निबंर्ते (मृतक), वय २८ व ा रा. कुजबा** ही गावातील इतर बांया सोबत शेतमालक परमानंद रामचंद तिजारे रा. टाकळी याचे डोंग्यात बसुन आमनदीचे पात्रातुन जात असतांना नदीचे पात्रात डोंगा असतांनी अचानक हव्याचा झोका आल्याने पाण्याचे लाटा निर्माण झाल्याने डोंगा नदीचे पात्रात पलटी होवून डोग्यात बसलेले बाया, डोंगा चालक हे पाण्यात पडल्याने पाण्यात बुडाले. त्यादरम्यान गावातील लोकांनी त्यांना नदी पात्रातुन बाहेर काढले व उपचाराकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र मांढळ येथे भरती केले असता उपचारा दरम्याण सौ. गिता रामदास निबंर्ते ही मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ.मंगला देवराव भोयर वय ४० वर्ष, रा. कुजबा, ता. कुही जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनी श्री आनंद कविराज मो.क्र. ९३०७१५१७३१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर